खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी

## साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

SANJAY MAR HRM

## घटक २) 'साहित्यरंग' पाठ्यपुस्तक

## लेख ६) सहावे सुख : यशवंत पाटणे

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

## 'साहित्यारंग' पाठ्यपुस्तक

# लेख ६) सहावे सुख : यशवंत पाटणे

### लेखक परिचय :

**ख्यातनाम वक्ते. वाचन संस्कृतीचे पुरस्कर्ते.** 'शेकोटी', 'स्वरगंगेच्या काठी', 'स्वयंशिल्पी', 'सुंदर जगण्यासाठी', 'ग्रंथ आमुचे साथी', 'सहावे सुख', 'चैतन्याचे चांदणे', 'उद्याच्या आनंदासाठी', 'सत्यशोधक तेंडुलकर', 'जगाच्या कल्याणा', 'चंदनाचे हात', 'एका अनाथाचे बंध' **इत्यादी ग्रंथांचे लेखन त्यांनी केलेले आहे.**

### या लेखाचा आशय :

'सहावे सुख' हा यशवंत पाटणे यांचा लेख आहे. **हा लेख सुख ह्या अनुभवाचा पट विस्तारित करणारा आहे.** या लेखातून यशवंत पाटणे यांनी ग्रंथवाचनाचे मोल दर्शविलेले आहे.

लेखक यशवंत पाटणे यांच्या वाचनात **शांताबाई शेळके यांचा 'सहावे सुख' हा सुंदर लेख येतो.** त्यात सुखाची संकल्पना शांताबाईंनी मांडली आहे. प्रत्येकाला आयुष्यात **आरोग्य, संपत्ती, प्रतिष्ठा, चांगला साथीदार आणि चांगली मुले** भेटावीत असे वाटते. पण या पाच सुखांबरोबर सहावे सुख वेगळे आणि दुर्मीळ असते. ते **अचानक, अवचितपणे आयुष्यात येते आणि संपूर्ण आयुष्य, जीवन मोहरून जाते. चिनी माणसेही एकमेकांना भेटल्यावर ही सहा सुखे मिळावीत, अशा शुभेच्छा देतात.** अशा या सहाव्या सुखाचे मूल्य लेखकाने या लेखात मांडले आहे.

लेखकाच्या मते दुर्मीळ, बहुमोल असे ग्रंथ हे सहावे सुख असून या सुखाला साद घालण्यासाठी **ग्रंथांची गोडी** असावी. **ग्रंथाच्या अक्षरांमध्ये आयुष्याला सुबक आकार देण्याचे सामर्थ्य असते. ग्रंथ आयुष्यभर आपली भावनिक सोबत करतात. वैचारिक बळ देतात. अंत:करणातील अंधारा कोपरा ज्ञानज्योतीने उजळून टाकतात.** उत्तम साहित्यकृती च्या वाचनातून आपल्याला उजेडाचे वारसदार होता येते. **श्यामची**

SANJAY MAR HRM

**आई, ययाती, मृत्युंजय, स्वामी, नटसम्राट, महानायक** यासारखे ग्रंथ म्हणजे मराठी साहित्यविश्वातली अक्षरलेणी आहेत. प्रत्येक नव्या वाचनाच्या वेळी नवी उत्कट अनुभूती देण्याची किमया त्यात आहे.

अमृताशी पैंजा मारीत आकाशाशी नातं जोडणाऱ्या **संतांचे साहित्य** हे तर आपल्या महाराष्ट्रीयन संस्कृतीचे संचित आहे. अशा संत-महंतांचे ऋण साने गुरुजींनी भारतीय संस्कृतीमध्ये व्यक्त केले आहे. आपल्या संस्कृतीचे मोठेपण समजण्यासाठी **साने गुरुजींच्या 'भारतीय संस्कृती'**मधील ज्ञान, भक्ती व कर्म आणि संयमाचे धडे गिरवले पाहिजेत. **"मी समाजासाठी, समाज माझ्यासाठी"** हा संबंध आपण जपायला हवा, असे साने गुरुजींना वाटते. **'संयम'** हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. मंदिरामध्ये प्रथमदर्शनी नजरेला पडणारी कासवाची मूर्ती ही संयमाचे नि वात्सल्याचे प्रतीक आहे. साने गुरुजी या कासवाला आपल्या संस्कृतीच्या गुरुस्थानी मानतात.

**'समस्त इंद्रियांवर संयम चांगला आहे, अशा माणसाचे चारित्र्य कायमचे सुप्रतिष्ठित होऊन जाते'** हा विचार आचारात येण्यासाठी **स्वामी विवेकानंदांच्या भाषणांचे संकलन** असणारे पुस्तक आवर्जून वाचले पाहिजे. कारण चांगले पुस्तक थेट आत्म्याला आनंद देते. **आत्मानंदाबरोबरच आत्मोन्नती हे उत्तम ग्रंथाचे अक्षरमूल्य असते.** सध्याच्या ज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगत जगात विज्ञानाचे स्वागत करताना आपण आत्मज्ञानापासून वंचित राहिलो, तर जीवनसौंदर्याची हानी होईल, अशी हानी होऊ नये म्हणूनच मनाची सावधानता बाळगली पाहिजे. सध्याच्या **दूरदर्शनसारख्या व्यापारीकरण झालेल्या माध्यमांमुळे लोकाभिरुचीला अत्यंत हिडीस वळण लागत आहे.** परिणामी पुस्तकांच्या वाचनातून होणारी मनन-चिंतन प्रक्रिया थंडावत चालली आहे. **आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी ग्रंथरूपाने आपल्याला 'सहावे सुख' लाभावे; अशी सदिच्छा शेवटी लेखक व्यक्त करतात.**

## या लेखाचे विशेष :

सहावे सुख' या यशवंत पाटणे यांच्या लेखातून सुख या विषयाची चर्चा आली आहे. मनुष्य आपल्या जीवनात आरोग्य, संपत्ती, प्रतिष्ठा, उत्तम जीवनसाथी व उत्तम संतती या पाच सुखांच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील असतो. **यापलीकडे काहींच्या वाट्याला श्रम, प्रतिभा, प्रयत्नातून जीवन सार्थकी लावणारे अकल्पित क्षण**

SANJAY MAR HRM

**येतात. त्याला सहावे सुख म्हणतात.** अमेरिकन चित्रपटात **'इन्ग्रीड' या रूपहीन नर्सला तिच्या जीवनात डॉक्टररुपी मिळालेला जीवनसाथी हे तिचे सहावे सुख म्हणता येईल. 'मी समाजासाठी, समाज माझ्यासाठी' म्हणणारे सानेगुरुजी समाजकार्यामध्ये 'सहावे सुख' शोधतात. सृष्टीतील उदात्त तत्त्वे, व्यक्तिमत्त्वाला उंची, जीवनाला सूर आणि जगण्याला प्रवाहीपणा देऊ शकतात. सूत्रबद्ध तत्त्वप्रतिपादन, चपलख उदाहरणे, प्रासादिक गद्यशैली आणि उपदेशपरता ही या लेखाची बलस्थाने आहेत.**

---

अध्यापन साहित्य निर्मिती :
डॉ. संजय शिंदे ,
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

**संदर्भ ग्रंथ :**

१) साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)

SANJAY MAR HRM